


# हॅलो प्रभात

नवे विचार...नवी सुरुवात

RNI NO.MAHMAR/2020/79996

▪ मुंबई ▪ पुणे ▪ सांगली ▪ कोल्हापूर ▪ सातारा ▪ सोलापूर ▪ अहिल्यानगर

वर्धापन दिन विशेषांक २०२६

▪ वर्ष : ०७ ▪ अंक : १७ ▪ रविवार, दि.१९ जुलै २०२६ ▪ किंमत : ३ रुपये ▪ पाने : ६


# कोल्हापुरात वैद्यकीय शिक्षणाचा मेगा ब्लूप्रिंट

## मंत्री हसन मुश्रीफ ; कामात दिरंगाई खपवून घेणार नाही

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

कोल्हापूर जिल्ह्यात उभारण्यात येत असलेल्या वैद्यकीय शिक्षणाच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांना गती देत राज्य सरकारने विकासाचा वेग वाढविण्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत. शासकीय होमिओपॅथी, आयुर्वेदिक, योगा व निसर्गोपचार महाविद्यालये तसेच ग्रामीण आरोग्य पथक परिसरातील अत्यावश्यक पायाभूत सुविधा कोणत्याही परिस्थितीत रखडता कामा नयेत, असा स्पष्ट इशारा देत वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी संबंधित यंत्रणांना कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

शेंडा पार्क येथील राजर्षी छत्रपती शाहू महाराज वैद्यकीय नगरीमध्ये आयोजित उच्चस्तरीय आढावा बैठकीत मंत्री मुश्रीफ यांनी विविध प्रकल्पांच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेतला. मौजे सांगाव येथील शासकीय होमिओपॅथी







महाविद्यालय व रुग्णालय, पिंपळगाव खुर्द येथील शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालय, उत्तूर येथील शासकीय योगा व निसर्गोपचार महाविद्यालय तसेच कागल येथील ग्रामीण आरोग्य पथक परिसरातील सुविधा तातडीने उभारण्यावर त्यांनी विशेष भर दिला.

पाणी, वीज, अंतर्गत रस्ते, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) यांसारख्या मूलभूत सुविधा पूर्ण होईपर्यंत कोणतीही दिरंगाई सहन केली जाणार नसल्याचे स्पष्ट करत आवश्यक प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. सुरू असलेली सर्व बांधकामे विहित मुदतीत, उच्च दर्जा राखून आणि कोणताही अडथळा न येऊ देता पूर्ण करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

बैठकीत पिंपळगाव खुर्द येथील आयुर्वेदिक महाविद्यालयाच्या बांधकामाची सद्यस्थिती, सांगाव येथील होमिओपॅथी महाविद्यालयासाठी पर्यावरणीय ना-हरकत प्रमाणपत्राची उपलब्धता तसेच उत्तूर येथील योगा व निसर्गोपचार महाविद्यालयाच्या कामाच्या प्रगतीचा सखोल आढावा घेण्यात आला. प्रकल्पांतील अडथळे तातडीने दूर करून कामांना आणखी गती देण्याचे निर्देशही मंत्री मुश्रीफ यांनी संबंधित विभागांना दिले.

या बैठकीस राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सदानंद भिसे, शासकीय आयुर्वेदिक व होमिओपॅथी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अभिजीत अहिरे, योगा व निसर्गोपचार महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. भाग्यश्री खोत, सार्वजनिक बांधकाम विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच संबंधित प्रकल्पांचे सल्लागार उपस्थित होते.




दै.हॅलो प्रभात

**महाराष्ट्र राज्य व्हॉलीबॉल असोसिएशनचे माजी अध्यक्ष, राजारामबापू पाटील कारखान्याचे अध्यक्ष, युवा नेते प्रतिकदादा पाटील यांचा आज वाढदिवस... त्यानिमित्त चार शब्द !!**

# युवकांचे आयडॉल..
# प्रतिकदादा जयंतराव पाटील!







लोकनेते राजारामबापू पाटील, माजी मंत्री आ. जयंतराव पाटील यांच्यानंतर तिसऱ्या पिढीचे प्रतिनिधी म्हणून प्रतिकदादा पाटील वाळवा तालुक्याच्या, सांगली जिल्ह्याच्या सार्वजनिक जीवनात कार्यरत झाले आहेत. स्व. बापूंनी वाळवा तालुक्याला विधायक वळण दिले, विविध सहकारी संस्थांच्या जाळे विणून वाळवा तालुक्यातील सर्वसामान्य माणसाचे जीवनमान उंचावले.. स्व. बापू खऱ्या अर्थाने वाळवा तालुक्याचे भाग्यविधाते ठरले आहेत. आ. जयंतराव पाटील हे बापूंच्या अकाली निधनाने आपले उच्च शिक्षण बाजूला ठेवून वाळवा तालुक्यातील सर्व सामान्य जनता आणि कार्यकत्यांच्या आग्रहा खातर सार्वजनिक व राजकीय जीवनात आले.. त्यांनी स्व. बापूंनी उभा केलेल्या सहकारी संस्था जीवापाड जपत या संस्थांचा विस्तार केला. त्यांनी वाळवा तालुक्याच्या प्रगतीस क्रांतिकारक चालना दिली तालुक्यातील शिवारात पाणी आणून वाळया आहे. वाळवा तालुक्याची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व वैचारिक प्रगती ही त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा साक्ष आहे.. त्यांनी राज्याच्या मंत्रीमंडळात अर्थ, गृह, ग्रामविकास व जलसंपदा अशा महत्वाच्या खात्यांची जबाबदारी पेलताना राज्याच्या प्रगतीमध्ये मोलाचे योगदान केलेले आहे. एक अभ्यासू, स्वच्छ व चारित्र्यसंफन नेता म्हणून राज्यात त्यांची ओळख आहे आणि हाच समृद्ध वारसा घेऊन प्रतिकदादा पाटील सार्वजनिक क्षेत्रात काम करीत आहेत.

हा राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखाना वाळवा तालुक्याच्या विकासाचा मुख्य केंद्रबिंदू आहे. ही तालुक्यातील एक मातृ संस्था आहे. या संस्थेच्या अध्यक्षपदी प्रतिकदादा पाटील यांची निवड झाल्यानंतर त्यांनी ऊस उत्पादक सर्वसामान्य शेतक-यां च्यासाठी ठिबक सिंचन योजना, सच्छिद्र पाईप निचरा प्रणाली, ऊसाची २५ लाख शुध्द रोपे शेतकऱ्यांना बांध पोच, अल्प दरात शेती साहित्य आदी विविध योजना सुरू केल्या आहेत. त्यास आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत नेण्याचा शेतकऱ्यांना चा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. त्यांचा प्रयत्न आहे. ड्रोन द्वारे औषध फवारणी आणि त्याच्या पुढे जाऊन 'मल्टी स्पेक्ट्रम ड्रोन'चा वापर करणारा राजारामबापू साखर कारखाना हा देशातील पहिला साखर कारखाना आहे.. यातून त्यांची दूरदृष्टी आणि शेतकऱ्यांच्या हिताची तळमळ दिसून येते..

**संग्राम रघुनाथ जाधव (आष्टा)**
**अध्यक्ष,**वाळवा तालुका युवक राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष

आपल्या परिसरातील मुले व मुलींनी उच्च शिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभा राहावे, या भावनेने त्यांनी राजारामबापू इंडोमेन्ट ट्रस्ट मधून आर्थिक सहाय्य योजना पुन्हा सुरू केली आहे. दादा हे शांत, संयमी, मायाळू व हळव्या मनाचे आहेत. त्यांनी मुक्या प्राण्यांच्यावर उपचार करण्यासाठी 'सारथी ॲनिमल रेस्क्यू सेंटर' सुरू केलेले आहे. या सेंटरमध्ये आजारी व अपघातग्रस्त प्राण्यांच्यावर उपचार करून त्यांचा सांभाळ केला जातो.. दादांची सार्वजनिक कार्याची सुरुवात ही 'जयंत दार्शिव निर्मूलन अभियान'च्या माध्यमातून झाली आहे. साधू ओळखावा, देव तेथेचि जाणावा,' या संत युक्तीप्रमाणे वाळवा तालुक्यातील दारिर्घ रेषेखालील गोर-गरीब जनतेच्या उन्नतीसाठी, त्यांच्या आरोग्य, शिक्षण, स्वयंरोजगारासाठी दादा अहोरात्र काम करीत आहेत. वाळवा तालुक्यातील सर्व सामान्य जनतेस अद्यावत आरोग्य सुविधा देण्यासाठी त्यांच्या

पुढाकाराने कापुसखेड नाका येथील नर्सिंग कॉलेजमध्ये 'श्रीमती कुसुमताई आरोग्य केंद्र' (ओपीडी) सुरू करण्यात आली आहे... वाळवा तालुक्यातील युवा उद्योजक व व्यावसायिकांना प्रोत्साहन आणि पाठबळ देण्यासाठी त्यांच्या दुरदृष्टीतून सुरू केलेली 'इस्लामपूर बिझनेस फोरम' (आय बी एफ) ही संस्था आज राज्या तील एक नामवंत संस्था म्हणून ओळखली जाते.. त्यांच्या नेतृत्वाखाली सध्या तालुक्या मध्ये युवकांचे मजबूत संघटन उभा राहीले आहे.. समाजातील शेतकरी, शेतमजूर, कामगार, बुक्क, महिला आणि उपेक्षित, गोर-गरीब वर्गाच्या प्रगतीसाठी ते कष्ट घेत आहेत. स्व. बापूंना तालुक्यातील जनतेचे अलोट प्रेम मिळाले.. आ. जयंतराव पाटील यांचे नेतृत्व तालुक्यातील जनतेने तळहाता बरील फोडाप्रमाणे जपले आहे.. तेच प्रेम आणि आशिर्वाद प्रतिकदादांना मिळत आहेत. हे युवा नेतृत्व असेच अधिक भरत जाबो आणि त्यांच्या हातून वाळवा तालुका, सांगली जिल्हा आणि महाराष्ट्र राज्यातील जनतेची उत्तम सेवा घडो...

**त्यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!**

**शब्दांकन - विश्वनाथ पाटसुते**

---


# २२ जुलैपासून पुण्यात राज्यस्तरीय कृषी-पशुधन प्रदर्शन

## मंत्री दत्तात्रय भरणे ; आधुनिक शेतीचा मेळावा

**बारामती : हॅलो प्रभात**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त २२ जुलै २०२६ रोजी पुण्यातील कृषी महाविद्यालयात राज्यस्तरीय कृषी व पशुधन प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून, ऑगस्टच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात या प्रदर्शनाची सांगता होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या उपस्थितीत प्रदर्शनाचे उद्घाटन होणार असल्याची माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

या प्रदर्शनात राज्यभरातील शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या (एफपीओ), कृषी उद्योजक, संशोधक, कृषी विद्यापीठे आणि विविध शासकीय संस्थांचा सहभाग राहणार आहे. आधुनिक शेतीतील तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), नैसर्गिक व सेंद्रिय शेती, कृषी प्रक्रिया उद्योग, पूरक व्यवसाय, पशुधन विकास आणि उत्पन्नवाढीसाठी उपयुक्त नवकल्पना यांचे प्रात्यक्षिक आणि मार्गदर्शन एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे.



महाबीज, स्मार्ट प्रकल्प, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, कृषी स्टार्टअप्स तसेच पशुसंवर्धन क्षेत्रातील आधुनिक उपक्रमांचे स्टॉल्स उभारले जाणार आहेत. यशस्वी शेतकरी, संशोधक आणि कृषी उद्योजकांच्या सहभागातून चर्चासत्रेही आयोजित केली जाणार आहेत. महिला शेतकरी सक्षमीकरण, मूल्यसाखळी विकास, ग्रामीण उद्योजकता आणि कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती देण्यासाठी विशेष माहिती कक्ष उभारले जाणार असून, उत्कृष्ट शेतकरी उत्पादक संस्था व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या घटकांचा गौरवही करण्यात येणार आहे.

---

# राष्ट्रपती भवनात झळकणार लोककलेचा ठसा



## खा.धनंजय महाडिक यांच्याकडून कलाकारांचा सत्कार

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

स्वातंत्र्यदिनानिमित्त १५ ऑगस्ट रोजी नवी दिल्लीतील राष्ट्रपती भवनात होणाऱ्या शासकीय कार्यक्रमात महाराष्ट्राची पारंपारिक लोककला सादर करण्याची संधी कोल्हापूरच्या श्रीजा लोकसंस्कृती फाउंडेशनच्या कलाकारांना मिळाली आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल खासदार धनंजय महाडिक यांनी कलाकारांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

यावेळी प्रजासत्ताक दिनानिमित्त २६ जानेवारी रोजी दिल्लीतील विजयपथावरील संचलनात महाराष्ट्राच्या चित्ररथासोबत सांस्कृतिक कार्यक्रम सादर करणाऱ्या कलाकारांचाही गौरव करण्यात आला. नृत्य दिग्दर्शक सागर बगाडे आणि चंद्रकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीजा फाउंडेशनच्या कलाकारांनी लेझीम नृत्य सादर केले होते. या चित्ररथाला यंदा देशात प्रथम क्रमांक मिळाल्याने कोल्हापूरच्या कलाकारांच्या कामगिरीची राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली.

१५ ऑगस्टच्या मुख्य शासकीय सोहळ्यातही महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचे प्रतिनिधित्व करण्यासाठी श्रीजा फाउंडेशनची निवड झाल्याबद्दल खासदार महाडिक यांनी कलाकारांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी राष्ट्रपती पुरस्कार विजेते कलावंत सागर बगाडे यांनी कोल्हापूरच्या कलाकारांना खासदार महाडिक यांचे सातत्याने मिळणारे प्रोत्साहन आणि पाठबळ याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कलाकारांनीही त्यांचा सत्कार केला. कार्यक्रमास श्रीजा लोकसंस्कृती फाउंडेशनचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील, उपाध्यक्ष शेखर वळीवडेकर, समन्वयक निरांक घाडगे, क्रीडा प्रशिक्षक राजेंद्र बनसोडे तसेच संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.


---

# उद्योगाभिमुख अध्यापनासाठी प्राध्यापकांचे प्रशिक्षण

## अनंतराव पवार अभियांत्रिकीत फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम

**पुणे : हॅलो प्रभात**

अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च, पर्वती (पुणे) येथील आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स विभागातर्फे 'ब्रिजिंग अकॅडेमिया अँड इंडस्ट्री : इमर्जिंग ट्रेंड्स अँड एक्स्पेक्टेशन्स' या विषयावर आठवडाभराचा फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम यशस्वीरीत्या पार पडला. बदलत्या उद्योग क्षेत्राच्या अपेक्षांशी प्राध्यापकांना जोडून विद्यार्थ्यांना अधिक रोजगारक्षम बनविण्याचा या उपक्रमाचा उद्देश होता.



कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ.सुनील ठाकरे, अंतर्गत गुणवत्ता कक्षाचे समन्वयक प्रा. गणेश कोंढाळकर आणि विभागप्रमुख डॉ. जितेंद्र मुसळे यांच्या उपस्थितीत झाले. शैक्षणिक संस्था आणि उद्योग क्षेत्रातील समन्वय अधिक बळकट करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान प्राध्यापकांनी आत्मसात करणे काळाची गरज असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले.

कार्यक्रमात ई-सूत्र टेक्नॉलॉजीजचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुयोग नाईकवाडे, कोडझोन आयटी सोल्युशन्सच्या शुभांगी शिंदे, महागुरू एआयचे अविराज विरपे, टेक्नोकेव्ह पुण्याच्या वृषाली देशपांडे-जोशी आणि कॅपजेमिनीच्या ऑटोमेशन इंजिनिअर तृप्ती पवार यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता, नवकल्पना, उद्योगाभिमुख कौशल्ये, उद्योजकता, सेलेनियम ऑटोमेशन टेस्टिंग आदी विषयांवर मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ. एस. बी. ठाकारे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. स्मिता शिरसाट यांनी काम पाहिले. आयक्यूएसी समन्वयक प्रा. जी. ई. कोंढाळकर व विभागप्रमुख डॉ. जितेंद्र मुसळे यांचे विशेष सहकार्य लाभले. संस्थेच्या सरचिटणीस प्रमिला गायकवाड यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल महाविद्यालयाचे अभिनंदन केले.

हॅलो प्रभात
नवे विचार...नवी सुरुवात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६(महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात, कार्यालय, ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली- ४१६ ४१६. (महाराष्ट्र)** येथून प्रसिद्ध केले.

■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)

■ पुणे आवृत्ती संपादक : संजीव शाळगावकर ■ सांगली आवृत्ती संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर ■ संपर्क : 9011889001


कास पठार हंगाम
2026-2027
सत्यमेव जयते
म.व.
वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे
महाराष्ट्र वन विभाग
आपले सहर्ष स्वागत आहे
|| हतिहास
आपली ओनख
वारसा आपला
आमिमान ||
|| संवर्धन करूया
गीरव वादवया
पिढ्यापडिया
जपुया ||
•पर्यटक विश्रांती पॅगोडा•
•निसर्ग पायवाट•
•पर्यटक विश्रांती कॅनोपी•
•पर्यटक निरीक्षण गॅलेरी•
जागतिक नैसर्गिक वारसा स्थळ कास पठार
सातारा वनविभाग
दैं.हॅलो प्रभात च्या वर्धापनदिनास •हा•र्दि•क•शु•भे•च्छा•

# 'फुलांचा स्वर्ग' कास पठार




**दै.हॅलो प्रभात**

**कास पुष्प पठाराने पर्यटनाच्या क्षेत्रात देशातच नव्हे तर जागतिक नकाशावर सातारा जिल्हयाचा लौकीक नोंदविला आहे. सौंदर्याची अनोखी खाण असणारे कास पुष्पपठार हे पश्चिम घाटासह वर्ल्ड हेरिटेज साईट म्हणजेच जागतिक वारसा स्थळामध्ये युनेस्कोकडून नुकतेच समाविष्ट करण्यात आले आहे. आज साताऱ्याच्या पर्यटनाची ओळख खऱ्या अर्थाने सातासमुद्रापार झाली आहे. सातारा शहरापासून अवघ्या २३ कि.मी. वर धरतीवरच्या स्वर्गरूपाने साक्षात कास पुष्प पठार वसले आहे. सध्या कास पठार हे विविध जातींच्या फुलांनी बहरत असून पर्यटकांची रिघ कास पठाराच्या दिशेने सुरु झाली आहे. या पठाराची माहिती देणारे www.kas.ind.in हे संकेतस्थळ आहे.**

कास पठार हे वर्ड हेरिटेज कमिटीने जुलै २०१२ मध्ये मान्य केलेलया पश्चिम घाटातील ३९ ठिकाणापैकी एक आहे.२१ देशांच्या सभासदासमोर पश्चिम घाटाला जागतीक वारसा स्थळाचे नामांकन मिळाले आहे. त्यातील कास पठार हे फुलांसाठी एकमेव नैसर्गिक वारसा स्थळ म्हणून नामांकन प्राप्त झालेले ठिकाण आहे. कास पुष्प पठाराचे नैसर्गिक आणि निसर्गदत्त देणगीची जोपासना करून या पठाराचा विकास करण्यात वन विभागाने पुढाकार घेतला आहे. कास पुष्प पठाराची जैव विविधता जोपासून ती वाढविण्यासाठी शासनाबरोबरच पर्यावरणप्रेमी आणि संस्थाचा मोठा वाटा आहे. कास पठाराची समुद्रसपाटी पासूनच उंची १२१३ मिटर असून पर्जन्यमान अंदाजे अडीच ते तीन हजार मि.मी. इतके आहे. कास पठार हे १७९२ हेक्टरवर पसरले असून यामध्ये वनखात्याची ११४२ हेक्टर तर खाजगी ६५० हेक्टर जमीनीचा समावेश आहे.







कास पुष्प पठारावर पश्चिम घाटातील अत्यंत दुर्मिळ असलेल्या सुमारे ८५० पेक्षा अधिक पुष्प वनस्पतींचे प्रकार आढळून आले आहेत. यामध्ये औषधी वनस्पतींचा अधिक समावेश आहे. तसेच किटक व विविध प्रकारच्या फुलपाखरांच्या ३२ प्रजाती आढळतात. सरपटणाऱ्या प्राण्यांच्या १९ प्रजाती, सस्तन प्राण्याच्या १० प्रजाती आणि पक्षांच्या ३० प्रजाती येथे आढळून येतात. कास पठार व परिसरात प्रदेशनिष्ठ, दुर्मिळ व अतिदुर्मिळ वनस्पती आहेत. रेड डाटा बुकमध्ये जवळपास ४० फुले असणाऱ्या प्रजाती कास पठारावर आढळतात. कास पठरावरुन सुक्ष्म हवामान हे जैविक घडामोंडीना उत्क्रांतीला पोषक आहे. कास पठारावर जाणारा प्रत्येकजण येथील विविधांगी फुले आणि वनस्पतीकडे आपोआपच आकर्षिला जातो. कास पुष्प पठारावर पुष्प आणि वनस्पतीमुळे येथील वातावरण रंगीबेरंगी असून कधी पांढरा शुभ्र, कधी लाल, निळा, जांभळा, अबोली अशा कितीतरी रंगांच्या छटांचे फुले पर्यटकांच्या डोळयांचे पारणे फेडतात. या फुलांवर पसरणाऱ्या इंद्रधनुष्यीछटा पाहण्यास मिळत असून हा परिसर जणु स्वप्नसृष्टीत पोहोचविणाराच ठरतो.

कास पठाराला जाताना नागमोडी वळणे आणि घाट संपताच विस्तीर्ण असे पठार डोळयात भरते, हेच ते ऐतिहासिक प्रसिध्द कास पठार आहे. निसर्गाची देणगी लाभलेल्या कास पुष्प पठाराला डोळयांचे पारणे फिटाव्या अशा फुलांची आणि पुष्प वनस्पतींची निसर्गदत्त देणगी लाभली आहे. लाल माती आणि खडकाळ भागात पण विस्तीर्ण पठारावर माणसाची नजर पोहोचत नाही तिथंपर्यंत हे पठार विविधरंगी फुलांच्या गालिच्यांनी बहरले आहे. या पठारावर बोचरा वारा पर्यटकांच्या स्वागताला सज्ज असलेल्या हलक्या सरी, गर्द धुके आणि हिरव्यागार विविध रंगाच्या वनस्पतीमुळे आणि नयनरम्य फुलांमुळे कास पुष्प पठार परिसर जणु धरतीवरचाच स्वर्ग असल्याचा भास येथे येणा-या प्रत्येकालाच होतो. या पुष्प पठारावरील क्षणात सुर्यकिरणांतील इंद्रधनुष्यीछटा तर क्षणात बोचरा वारा, क्षणार्धात दाट धुके, रिमझिम पावसाच्या सरी अशा वातावरणातील बदलांचाही हवे-हवेसेपणा प्रत्येकालाच मोहात पाडत असून जणू धुक्यात न्हाऊन जावे अशीच मनोमन इच्छा या परिसराच्या आकर्षणाने होत आहे.

कास पठारावर पावसाळा संपता संपता ऑगस्ट ते ऑक्टोबर या महिन्यात रानफुले येतात. ही रानफुले विविध प्रकारची असतात. हिरव्यागार गालीच्यावर नजर जाईल तिथपर्यंत पसरलेली, वा-याची झुळुक आली की डोलणारी पांढरी अशी नानाविध रंगाची फुले अक्षरशः मनमोहून टाकतात. यांचे एक वैशिष्ट्य म्हणजे दर पंधरा दिवसांनी त्यांचे रंग बदलत असतात. श्रावणात निळी सीतेची आसवे आणि लाल रंगाची तेरड्याची फुले, मध्ये-मध्ये पांढऱ्या गेंदांच्या फुलांचे ताटवेच्या ताटवे फुललेले दिसतात. हे नयनरम्य दृष्य पाहताना प्रत्येकाचे मन हेलावून जाते. या फुलांचा बहर कमी होईपर्यंत पांढरे तुरेवाली आमरी वर येते. मोठ्या तळ्यामध्ये पांढरी छोटी-छोटी कुमुदिनीची कमळे संपूर्ण तलाव झाकून टाकतात. तळयामध्ये जणू साठा करून ठेवल्यासारखी कमळांची फुले असून अलगद एखादा स्नॅप घेऊन तो संग्रही ठेवण्याचा मोह प्रत्येकालाच पडतो. या पठारावर कंदी पुष्पांचे विविध प्रकार निचुर्डी, अबोलिमा, ब्युगोनिया, दीपकांडी, चवर, गौरीहार, रानहळद, आभाळी, नभाळी, हत्तीची सोंड, सापकांदा, नागफणी, शेषगिरी, ड्रॉसेरा इत्यादी नाना प्रकारची फुले उगवतात.

कास संरक्षण समितीच्या वतीने प्रति माणसी १० रुपये प्रमाणे प्रवेश शुल्क (१२ वर्षावरील) आकारले जाते. प्रवेश शुल्क आता ऑनलाईन भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली असून यासाठी www.kas.ind.in या संकेतस्थळावर माहिती मिळेल.

▸ **शब्दांकन - सूर्यकांत पाटणकर**

## पर्यटकांच्या सोयीसाठी...

कास पठारला भेट देणाऱ्या पर्यटकांसाठी सातारा वन विभाग सातत्याने प्रयत्नशील राहिला आहे.पर्यटकांना सोयी सुविधा देण्यासाठी तसेच कास पठाराचे सौंदर्य पर्यटकांना सहजरीत्या न्याहाळता यावे यासाठी वन विभागाने कास पठारावर विविध सोयी सुविधा पर्यटकांसाठी निर्माण केल्या आहेत.

- जागतिक वारसा स्थळ असणाऱ्या कास पठाराकडे ऑगस्टनंतर पर्यटकांची पावले आपोआप वळतात. कास पठाराला भेट देणाऱ्या पर्यटकांच्या स्वागताला 'स्वागत कमान' उभारली आहे. सातारा वन विभागाने उभारलेल्या या स्वागत कमानीमुळे 'कासपुष्प पठार' जणू काही पर्यटकांचे स्वागतच करत आहे.
- कास पठारावर निसर्गाचे सौंदर्य सहज न्याहाळण्यासाठी पठारापासून उंचीवर पर्यटक गॅलरी पर्यटकांसाठी निर्माण केली आहे या गॅलरीतून कासचे सौंदर्य पर्यटकांना सहज न्याहाळता येते.
- कास पठारातील फुलांचे सौंदर्य अबाधित राहण्यासाठी सातारा वन विभागाने पर्यटकांसाठी खास पर्यटन मार्ग बनवला आहे.पर्यटकांची होणारी गर्दी व त्यामुळे होणारे फुलांचे नुकसान टाळण्यासाठी सातारा वन विभागाने दक्षता घेतली आहे.
- पर्यटकांना कास पुष्प पठाराचे सौंदर्य बसून न्याहाळता यावे यासाठी पर्यटकांना पर्यटक कॅनोपीची व्यवस्था वन विभागाने केली आहे यातून हिरव्या गालिच्या मधून रंगीबेरंगी फुलांची उधळण सहज पाहता येते.









## थकीत भाडे न भरलेल्या सहा गाळ्यांना 'मनपा'ने केले सील

कोल्हापूर : हॅलो प्रभात

कोल्हापूर महानगरपालिकेच्या परवाना व इस्टेट विभागाने आज महापालिकेच्या मुख्य इमारतीतील महात्मा गांधी मार्केटमधील व्यावसायिक संकुलात विशेष मोहीम राबवून थकीत इस्टेट भाडे असलेल्या सहा गाळ्यांवर सील करण्याची कारवाई केली. महापालिकेकडून संबंधित गाळेधारकांना यापूर्वीच थकीत भाडे भरण्याबाबत नोटीस व लेखी सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र, सूचना देऊनही संबंधितांनी थकबाकीची रक्कम न भरता व्यवसाय सुरू ठेवल्याचे निदर्शनास आल्याने ही कारवाई करण्यात आली. तसेच काही गाळेधारकांनी आपले गाळे इतरांना भाड्याने दिल्याचे आढळून आल्याने त्यांच्यावरही गाळे सील करण्याची कारवाई करण्यात आली.

सदरची मोहीम उपआयुक्त किरणकुमार धनवाडे, सहाय्यक आयुक्त राम काटकर, इस्टेट ऑफिसर शेखर साळोखे, परवाना अधीक्षक अशोक यादव यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. यावेळी इस्टेट विभागाचे रविंद्र काळे, संदीप भोई, कल्पना शिरदवाडे, प्रथमेश पवार आणि भोला पाटणकर उपस्थित होते.

महापालिकेने यापुढेही थकबाकीदारांवर अशीच कठोर कारवाई सुरू ठेवण्याचा इशारा दिला असून आवश्यकतेनुसार दुकानगाळे सील करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले आहे. महापालिकेच्या मालकीच्या दुकानाचे भाडेकरूंनी आपली थकबाकी तातडीने भरावी, असे आवाहनही प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# 'गरवारे'त अकरावीच्या विद्यार्थिनींचे जल्लोषात स्वागत

## कौशल्याधारित शिक्षणावर डॉ.अनिल सुगते यांचा भर

सांगली : हॅलो प्रभात

येथील श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालयात अकरावीतील विद्यार्थिनींचा स्वागत समारंभ, सांस्कृतिक विभागाचे उद्घाटन आणि महाकवी कालिदास दिन असा त्रिसूत्री कार्यक्रम उत्साहात पार पडला. प्र. प्राचार्य डॉ. अनिल सुगते यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून विद्यार्थिनींना शिक्षणासोबत कौशल्य विकासाचे महत्त्व पटवून दिले.

डॉ. सुगते म्हणाले, शिक्षण हे व्यक्तिमत्त्व विकास, बौद्धिक प्रगती आणि आर्थिक स्थैर्याचे प्रभावी साधन आहे. बदलत्या काळात पारंपरिक शिक्षणाबरोबरच संवादकौशल्य, तांत्रिक ज्ञान, समस्या निवारण क्षमता आणि उद्योगाभिमुख कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक आहे. महाविद्यालयातील शिस्त, नियम आणि विविध उपक्रमांचा लाभ घेत विद्यार्थिनींनी गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वाटचाल करावी, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी सांस्कृतिक विभागाचे उद्घाटनही करण्यात आले.



महाकवी कालिदास दिनानिमित्त कनिष्ठ विभागातील शिक्षिका ऐश्वर्या जाधव यांनी कालिदासांच्या जीवनकार्याचा परिचय करून दिला. बारावी कला शाखेतील मुक्ता निरलगी, मुग्धा मेहेंदळे आणि आरजू पाकजादे यांनी मेघदूतमधील श्लोकांचे सादरीकरण केले. दहावीमध्ये उल्लेखनीय गुण मिळविलेल्या नवप्रवेशित विद्यार्थिनींचाही सत्कार करण्यात आला.उपप्राचार्य डॉ. नंदिनी काळे यांनी विद्यार्थिनींचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या. पर्यवेक्षक सुनिता माळी यांनी प्रास्ताविक केले, सुखदा कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले, तर सांस्कृतिक विभाग प्रमुख अपर्णा जोशी यांनी आभार मानले. कार्यक्रमाला शिक्षक, विद्यार्थिनी आणि संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# फडणवीसांनी धनगर समाजाच्या आरक्षणाचे बारा वाजवले : विक्रम ढोणे

जत : हॅलो प्रभात



धनगर आरक्षण प्रश्न सोडवण्याऐवजी समित्या नेमून धनगर समाजाच्या आरक्षणाचे बारा वाजवल्याची भावना धनगर समाजाची झाली असल्याचे मत धनगर विवेक जागृती अभियानाचे संयोजक विक्रम ढोणे यांनी सांगितले.

बारामती येथील २०१४ च्या धनगर समाजाच्या आमरण उपोषणाच्या ठिकाणी तत्कालीन भाजप प्रदेशाध्यक्ष ,विरोधी पक्षनेते सध्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी धनगर समाजाला आश्वस्त केले होते की सत्ता आली की पहिल्या कॅबिनेटमध्ये धनगर आरक्षण प्रश्न सोडवतो पण आज १२ वर्षे उलटूनही प्रश्न सोडवण्याऐवजी समित्या नेमून वेळकाढूपणा करून धनगर समाजाच्या आरक्षण प्रश्नाचे बारा वाजवले असल्याची भावना धनगर समाजाची झाली आहे.

२९ जुलै २०१४ साली फडणवीसांनी आमरण उपोषणाच्या सांगता सभेला आश्वासन देऊन फडणवीसांनी धनगर समाजाचा विश्वासघात केला असून आम्ही या घटनेचा निषेध करून विश्वासघात दिवस साजरा करीत असल्याचे धनगर विवेक जागृती अभियानाचे संयोजक विक्रम ढोणे यांनी सांगितले.










दै.हॅलो प्रभात च्या वर्धापनदिनास •हा•र्दि•क•शु•भे•च्छा•

# आर्किटेक्चरमध्ये उज्ज्वल भविष्य : डॉ.ए.के.गुप्ता

## आधुनिक तंत्रज्ञानामुळे वाढल्या संधी

कोल्हापूर : हॅलो प्रभात

आर्किटेक्चर अर्थात वास्तुकला हे विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला दिशा देत समाजाच्या विकासात मोलाचे योगदान देणारे आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने भविष्य घडविणारे करिअर आहे. हे क्षेत्र केवळ इमारतींची रचना करण्यापुरते मर्यादित नसून सर्जनशीलता, पर्यावरणपूरक विचार, संशोधन आणि नावीन्यपूर्ण कल्पनांना आकार देणारे क्षेत्र असल्याचे प्रतिपादन डी. वाय. पाटील ग्रुपचे कार्यकारी संचालक डॉ. ए. के. गुप्ता यांनी केले.

डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, कसबा बावडा येथील स्कूल ऑफ आर्किटेक्चरतर्फे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या बी.आर्क. प्रवेश प्रक्रियेबाबत विद्यार्थी व पालकांसाठी आयोजित मार्गदर्शन परिसंवादात ते बोलत होते. बारावी विज्ञान शाखेतील विद्यार्थी, पालक तसेच वास्तुकला क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी या परिसंवादाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

डॉ. गुप्ता म्हणाले, आजच्या बदलत्या युगात वास्तुविशारदाची भूमिका केवळ इमारतींची रचना करणाऱ्या व्यावसायिकाची राहिलेली नाही. स्मार्ट सिटी, शाश्वत विकास, कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल तंत्रज्ञान आणि पर्यावरणपूरक नियोजन या क्षेत्रांमध्ये वास्तुविशारदांना मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध होत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी स्वतःची आवड, सर्जनशीलता आणि कौशल्यांचा योग्य वापर करून या क्षेत्रात करिअर घडवावे.



परिसंवादात बी.आर्क. प्रवेशासाठी आवश्यक पात्रता, नाटा व जेईई पेपर २ परीक्षा, केंद्रीय प्रवेश प्रक्रिया २०२६-२७ मधील महत्त्वाचे बदल, शिष्यवृत्ती, आरक्षण, आवश्यक कागदपत्रे, प्रवेश क्षमता, सीट वितरण तसेच प्रवेश प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्याचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले

यावेळी स्कूल ऑफ आर्किटेक्चरमधील एआय, बीआयएम, डिजिटल ट्वीन, पॅरामेट्रीक डिझाइन, स्मार्ट सिटीज, ३ डी प्रिंटींग यांसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित अध्यापन, सुसज्ज स्टुडिओ व प्रयोगशाळा, उद्योगाभिमुख प्रशिक्षण, इंटर्नशिप, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील संधी तसेच विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावर पटकाविलेल्या नासा आर्की. लुईस आय कान ट्रॉफी बद्दल माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. रोजगाराबरोबरच उद्योजकतेच्या वाढत्या संधींवरही यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.

स्कूल ऑफ आर्किटेक्चरचे प्रमुख प्रा.इंद्रजीत जाधव यांनी स्वागत करून संस्थेच्या शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली. प्रवेश समन्वयक आर्कि. मंजित जाधव व आर्कि. तिलोत्तमा पाडळे व सर्व प्राध्यापक यांनी कार्यक्रमाच्या आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

यावेळी प्राचार्य डॉ.एस.डी.चेडे, रजिस्ट्रार डॉ. एल. व्ही. मालदे, अधिष्ठाता डॉ. राहुल पाटील, प्रवेश प्रक्रिया प्रमुख प्रा. रवींद्र बेन्नी यांच्यासह विभागप्रमुख, प्राध्यापक विद्यार्थी व पालकवर्ग उपस्थित होते.संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, उपाध्यक्ष आमदार सतेज पाटील, विश्वस्त ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले.







